CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPANY LTD.
Old Power House Premises, Dr. Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No:- CGRF/AZ/AUR/R/ 545 / 2015/ 08 Date :-

To,
01) The Executive Engineer ( Administration)
Nodal Office, O/O Superintending Engineer ,
O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad

*Sub:-* Forwarding of grievance in respect of Smt. Tejabai Dharamchand
At post , Puri Tq. Gangapur Dist. Aurangabad 431 201 ( M.S. ) India
( Consumer No. 508690000320 / 508610000324 )

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum, in respect of Smt. Tejabai Dharamchand At post , Puri Tq. Gangapur Dist. Aurangabad 431 201

You are requested to Redress the grievance or submit your Para wise reply at the time of hearing. The hearing in the matter will be held on 2**7.01 .2015** at 12.00 Hours.

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad

Encl: As above

Copy to:-

Smt. Tejabai Dharamchand
At post , Puri Tq. Gangapur Dist.
Aurangabad 431 201

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**प्रकरण क्र.सीजीआरएफ / एझेड / औबाद / ग्रामिण / ५४५/ २०१५ / ०८**

**तक्रार दाखल दिनांक :- ०९.०१.२०१५.**
**निकाल दिनांक :- ०३.०३.२०१५.**

**श्रीमती. तेजाबाई धरमचंद्र जैन, तक्रारदार**
**मु.पो. पुरी, ता. गंगापुर,**
**जि. औरंगाबाद ४३१ २०१.**
**( ग्राहक क्रमांक ५०८६९००००३२० व ५०८६१००००३२४ )**

**विरुध्द**

**कार्यकारी अभियंता ( प्रशासन ), गैरअर्जदार**
**ग्रामिण विभाग,नोडल ऑफिस,**
**म.रा.वि.वि.कं.म. औरंगाबाद -**

मंच सदस्य

| | |
|---|---|
| डॉ. भास्कर गो.पालवे, | अध्यक्ष |
| श्री. नामदेव आर गांधले, | सदस्य / सचिव |
| श्री. विलासचंद्र सु. काबरा, | सदस्य |

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निर्णय –**

अर्जदार श्रीमती तेजाबाई धरमचंद्र जैन यांचा वारस मुलगा नेमीचंद तेजाबाई बाकलीवाल मु.पो. पुरी, पो. सोलेगांव ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांनी महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विदयुतलोकपाल ) विनिमय २००६ च्या अनुसुचि अ दिनांक ३०.१२.२०१४ रोजी कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ग्रामिण मंडळ,

पान क्रमांक २/-

औरंगाबाद यांच`कडे तक्रार अर्जके ला आहे तकार अर्जाची प्रत कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) , ग्रामिण मंडळ, औरंगाबाद यांना दिनांक ०९.०१.२०१५ रोजी पाठविण्यात आली आहे . तक्रार अर्जाचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे.

१ ) अर्जदार श्रीमती तेजाबाई धरमचंद जैन हा महावितरण कंपनीच्या ग्राहक असून त्यांचे कृषिपंप ग्राहक क्रमांक ५०८६९००००३२० व ५०८६१००००३२४ असे आहेत .११ के.व्ही.ए लाईनचा पुरवठा खंडीत झाला असता तो अखंडीत केला नाही. मा. विदयुत आयोगाने कृती मानकेत दाखविल्याप्रमाणे देय भरपाई प्रत्येक तासाला ५० रुपये मिळणेविषयी तक्रार केली आहे. दिनांक ३१.०८.२०१३ रोजी सहाय्यक अभियंता , गंगापुर कार्यालयास अर्ज देऊन विदयुत पुरवठा सुरळीत करण्याची विनंती केली होती. दिनांक १९.११.२०१३ रोजी सहाय्यक अभियंता कार्यालयात रु. १३६०००/- मागणी केली होती. एकूण ५७ दिवस विज पुरवठा बेकायदेशीर बंद होता. त्याची देय भरपाई दोन्ही पंपास रुपये १३६८००/- इतके मंजूर करावी अशी विनंती या मंचास केलीली आहे

२ कार्यकारी अभियंता ( प्रशासन ), ग्रामिण मंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक १०.०२.२०१५ चे लेखी म्हणणे यामंचास सादर केले आहे . त्यानुसार अर्जदाराचे वारस श्री. नेमीचंद धरमचंद जैन हे कधीही अधिक्षक अभियंता, ग्रामिण , औरंगाबाद यांचे कार्यालयात कुठल्याही अधिका-याकडे आले नाहीत त्यांनी अंतर्गत ग्रा-हाणे निवारण कक्षात त्क्रार अर्ज केला नाही.सदरील तक्रार दाराने अंतर्गत गा-हाणे निवारण कक्षात तक्रार दाखल करणे आवश्यक होते. पूर्वी दिनांक ११.१२.२०१२ रोजीच्या निकालानुसार ग्राहकाची तक्रार या मंचाने फेटाळली आहे. तरीही अर्जदार पुन्हा त्याच स्वरुपाच्या तक्रारी देवून सर्व संबधिताचा व मा. मंचाचा वेळ वाया घालवित आहे.

करारनाम्यातील अट क्रमांक ११ नुसार विज वितरण कंपनीने स्पष्टपणे नमूद केले आहे की यत्रसंचे व यत्रातील बिघाड या कारणामुळे विदयुत पुरवठयातील व्यत्ययास व उपभोगत्याच्या

पान क्रमांक ३/-

झालेल्या नुकसानीस पुरवठादार जबाबदार / उत्तरादायी राहणार नाही. श्री. नेमीचंद धरमचंद बाकलीवाल हे ग्राहकाचे वारस व ते नियमीत विज बिलाचा भरणा करीत नाही . त्यांचा मागील विज भरणा दिनांक ३०.०६.१९९८ व ०७.११.२००२ व जानेवारी २०१० असा अनियमित आहे . विज वितरण कंपनी महाराष्ट्र विदयुत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या नियमानुसार विज बिलाची आकारणी करते.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निष्कर्ष -**

वरीलप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांनी सादर केलेले लेखी व तोंडी म्हणण्यानुसार मंच खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## आदेश

१ ) अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२ ) गैरअर्जदार यांनी ग्राहकाकडून नियमानुसार विज बिलाची वसुली करावी.

३ ) अर्जदाराचा अर्ज आर्थिक भरपाईविना निकाली काढण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | विलासचंद्र. सु. काबरा | नामदेव रा.गांधले |
| अध्यक्ष | सदस्य | सदस्य/सचिव |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.


क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना / ५४५ /२०१५ / ०८ / दिनांक :-

प्रति,
श्रीमती तेजाबाई धरमचंद जैन,
मु.पो. पुरी, ता. गंगापुर,
जिल्हा औरंगाबाद
ग्राहक क्रमांक ५०८६९००००३२० व
५०८६१००००३२४

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/जालना / ५४५ / २०१५ / ०८ )

आपण दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रति,सविनय सादर
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रति,
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. मंडळ कार्यालय, जालना
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
प्लॉट नं १२,शिवकृपा, विजयनगर,छावणी,
नागपुर ४४००१३
फोन नं. (०७१२)२०२२१९८ - E-mail – cgrfnz@gmail.in /
sectretaryombudsmannagpur@gmail.com